**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात, दादरा नगर हवेली आणि दीव दमणच्या दौऱ्यावर, विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार

- चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त

- महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांतली सर्वाधिक परकीय गुंतवणूक झाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**आणि**

- कॅनडा आणि मेक्सिकोच्या आयातीवर २५ टक्के कर लागू करण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढे ढकलला

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात, दादरा नगर हवेली आणि दीव दमणच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यादरम्यान मोदी सुरत, नवसारी आणि दमणमधल्या सिल्वासा इथं विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. आज दुपारी दोन वाजता दादरा, नगर हवेली आणि दमण इथं २ हजार ५८७ कोटी मूल्यांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. तसंच सिल्वासा इथं जाहीर सभेला संबोधित करतील. त्यानंतर सुरतमध्ये सुरत अन्न सुरक्षा आणि परिपूर्णता मोहिमेचा शुभारंभ करतील. सुरतमधील दोन लाख लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचा लाभ मिळणार आहे. तसंच उद्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नवसारीमध्ये होणाऱ्या लखपती दीदी संमेलनाला मोदी उपस्थिती राहणार आहेत. यावेळी २५ हजाराहून अधिक बचत गटांमधील अडीच लाख महिलांना साडेचारशे कोटी रुपयांहून अधिक मदत वितरित करतील.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता
७ मार्च २०२५ शुक्रवार

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र ८ पूर्णांक ७ दशांश, सेवा क्षेत्र ७ पूर्णांक ८ दशांश आणि उद्योग क्षेत्र ४ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत आज हा अहवाल मांडला. या आर्थिक वर्षात राज्याचे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे. तर दरडोई उत्पन्न २ लाख ७८ हजार ६८१ रुपयांवरून ११ टक्क्यांनी वाढून ३ लाख ९ हजार ३४० रुपये होण्याचा अंदाज आहे. स्थूल उत्पन्नाचा विचार करता महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असेल. मात्र दरडोई उत्पन्नामध्ये तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू यांच्यानंतर राज्याचा क्रमांक लागतो.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचे महसुली उत्पन्न ४ कोटी ८६ लाख ११६ कोटी रुपये होते. यंदा ते केवळ १३ हजार कोटींनी वाढून सुमारे ५ लाख कोटी रुपये होईल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. गेल्यावर्षी ५ लाख ५ हजार ६४७ कोटी रुपये असलेला महसूली खर्च यंदा ५ लाख १९ हजार ५१४ कोटी होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि महसुली तूट ४ दशांश टक्के असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे.

<><><><><>

धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी माध्यमांसमोर दिली, मात्र सभागृहाला हे अजूनही कळवलेलं नाही, हा सभागृहाचा अवमान आहे असा आरोप विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज विधानसभेत केला. कुठल्याही मंत्र्याने राजीनामा दिल्यावर ते सर्वात आधी सभागृहाला कळवलं जातं, नंतर ते माध्यमांना सांगितलं जातं, त्यामुळे असा चुकीचा पायंडा पाडू नये, असं

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी सभागृहात सांगितलं. मात्र असं कळवण्याची पद्धत नाही, मात्र यासाठी स्वतंत्र नोटिफिकेशन काढली जाईल, असं तालिका अध्यक्ष संजय केळकर यांनी सांगितलं. यावर विरोधी पक्षाच्या सदस्यांचं समाधान न झाल्यामुळे त्यांनी घोषणाबाजी सुरू केली आणि सभात्याग केला.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केल्याचा आणि राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत विधान परिषदेत आज सत्ताधारी आक्रमक झाले. दोन्ही बाजूंनी झालेल्या शाब्दिक खडाजंगीमुळे कामकाज तीनदा तहकूब करावं लागलं.

आज नियमित कामकाज सुरू होताच भाजपा गटनेते प्रवीण दरेकर यांनी या मुद्दा उपस्थित करत अनिल परब यांनी माफी मागावी अशी मागणी केली. अनिल परब यांच्या म्हणण्याच्या अर्थाचा अनर्थ करण्यात आला मात्र काही अवमानकारक असल्यास विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिलगिरी व्यक्त करत असल्याचं सांगितलं. विरोधी पक्षनेत्यांनी दिलगिरी व्यक्त केल्यामुळे या वादावर पडदा पडावा अशी अपेक्षा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केल्यानंतर सुरळीत कामकाज सुरू झालं.

विधान परिषदेत आज २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या ६ हजार ४८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आल्या. मात्र, खर्च आणि उत्पन्नाचा योग्य ताळमेळ नसल्यानं राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याची टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेत केली.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या पाचव्या दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर सरकारविरोधात निदर्शनं केली. राज्यात महिला असुरक्षित असून बलात्काऱ्यांना सरकार पाठीशी घालत असल्याचा आरोप विरोधकांनी केला. महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी मंत्री जयकुमार गोरे तसंच स्वारगेट स्थानकावरच्या बलात्कार प्रकरणी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मंत्री योगेश कदम यांची हकालपट्टी करा, अशी मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी यावेळी केली.

<><><><>

गेल्या दहा वर्षांतली विक्रमी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात केवळ नऊ महिन्यात आली असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि देशांतर्गत व्यापार विभागानं डिसेंबर २०२४ पर्यंतचा परकीय गुंतवणुकीसंदर्भातल्या अहवालात ही माहिती दिली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातल्या पहिल्या ९ महिन्यात आतापर्यंत एकूण १ लाख ३९ हजार ४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या १० वर्षात महाराष्ट्रात एका वर्षात आलेली सर्वाधिक परकीय गुंतवणूक आहे. या गुंतवणुकीसह महायुती सरकारनं आपलाच २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा विक्रम मोडला आहे, संपूर्ण महाराष्ट्राचं पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात आनंद व्यक्त केला आहे.

<><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारतीय संगीत उद्योगाच्या सहकार्यानं ‘रिझोनेटः द ईडीएम चॅलेंज’ या स्पर्धेचं  आयोजन करत आहे. दृक-श्राव्य आणि मनोरंजन विश्वात सृजनशील प्रतिभेला आणि नवोन्मेषाला वाव देणाऱ्या क्रिएट इन इंडिया चॅलेंजचा एक भाग म्हणून जागतिक दृक-श्राव्य मनोरंजन शिखर परिषद - वेव्हज २०२५ मध्ये या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. ही स्पर्धा कोणत्याही

देशातील इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिकची रचना आणि निर्मितीचा पूर्वानुभव असलेले कलाकार, संगीत रचनाकार, संगीतकार आणि सादरकर्ते यांच्यासाठी आहे. या संगीतमय स्पर्धेला मिळणारा अभूतपूर्व प्रतिसाद लक्षात घेत ईडीएम चॅलेंजसाठी नावनोंदणी करण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत वाढवण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल, याचा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला. केंद्रीय औद्यागिक सुरक्षा दल-CISF च्या ५६ व्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते जवानांशी बोलत होते. देशातील महत्त्वाच्या संस्थांच्या सुरक्षेत तैनात असलेलं CISF हा राष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भाग असल्याचंही शाह म्हणाले. CISF च्या महिला तुकडीचंही शाह यांनी कौतुक केलं.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिकोच्या अध्यक्षांशी चर्चा केल्यानंतर बहुतेक वस्तूंवरचा २५ टक्के कर लागू करण्याचा निर्णय एक महिन्यासाठी पुढे ढकलला आहे. त्यांनी काल ही घोषणा केली. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात कॅनडा आणि मेक्सिकोशी केलेल्या व्यापार कराराचं पालन करणाऱ्या वस्तूंना ही सवलत लागू होईल. मात्र, अमेरिकेच्या निर्यातीवर शुल्क आकारणाऱ्या देशांवर अमेरिका येत्या २ एप्रिलपासून आयात कर लागू करण्यावर ठाम असल्याचं ट्रम्प यांचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा आरोपी तहव्वुर राणा याची भारतातल्या प्रत्यार्पण रोखण्यासाठीची याचिका अमेरिकेच्या न्यायालयाने फेटाळली आहे.

//<><><><><>//